नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १९/१०/२०२६ (सोमवार )

---

## २ तासात जबरी चोरीचा गुन्हा उघड, आरोपी अटक
## ७० हजारांचा मुद्देमाल जप्त
## मोहपा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मोहपा :—** मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री इश्वर हनवते, प्रभारी अधिकारी मोहपा, नागपुर ग्रामीण यांच्या नेतृत्वात दिनांक १८/१०/२०२६ रोजी जबरी चोरीचा गुन्हा अवघ्या २ तसात उघड करून ७०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दिनांक १७/१०/२०२६ रोजी झिल्पी येथील फिर्यादी उपचारा कामी बस ने दवाखान्यात गेली असता बसस्टॉप येथुन गावी पायदळ जात असतांना आरोपी हा मोटर सायकल ने तेथे येवुन फिर्यादीला गावी सोडुन देतो असे म्हणुन फिर्यादीला गाडीवर बसवुन तिला मौजा झिल्पी शेतशिवारा मध्ये सुनसान ठिकाणी नेवुन फिर्यादीच्या सोन्याची पोत आणि हातातील थैली जबरीने हिसकावुन नेली. सदर प्रकरणी मोहपा पोलीस स्टेशन येथे कलम ३०४(२) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद आहे.

नमुद प्रकरणी मोहपा पोलीस स्टेशनचे गुन्हे शोध पथकाचे अधिकारी आणि अंमलदार यांनी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे तात्काळ आरोपी **राकेश श्रावणजी मरसकोल्हे, वय ३५ वर्ष, रा हेटी आकोली ता. सेलु जि वर्धा, ह.मु सतनवरी बाजारगाव ,ता. काटोल जि नागपुर** निष्पन्न केले. दिनांक १७/१०/२०२६ रोजी आरोपीला झिल्पी शिवारातुन

ताब्यात घेवुन त्यास कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्याने सदर गुन्हा केल्याची माहीती दिली.

पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीने सदर गुन्हयात चोरी गेलेले पिवळया धातुची पोत किंमती ४०,०००/— रूपये आणि गुन्हा करण्यासाठी वापरलेली दुचाकी किंमती ३०,०००/— रूपये असा एकुण ७०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली.

## ०२ तासाच्या आत जबरी चोरीचा गुन्हा उघड, २ आरोपी अटक
## कळमेश्वर पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन कळमेश्वरः— **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री सागर खर्डे, उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर उपविभाग यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री मनोज काळबांडे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कळमेश्वर नागपूर ग्रामीण यांच्या नेतृत्वात दिनांक १९/१०/२०२६ रोजी कळमेश्वर पोलीसांनी अवघ्या ०२ तासाच्या आत जबरी चोरीचा गुन्हा उघड केला आहे. पोलीस स्टेशन कळमेश्वर येथील सेलू उड्डाणपुलाजवळ एका युवकाकडुन पैसे हिसकावुन जबरी चोरी करणाऱ्या ०२ आरोपींना अटक करण्यात आली आहे.**

पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत फिर्यादी विशाल दीपक कावरे, वय १८ वर्षे, रा. उमरी, तहसील कटंगी, जिल्हा बालाघाट, मध्य प्रदेश यांनी दिनांक १९/१०/२०२६ रोजी दिलेल्या तक्रारीनुसार, दिनांक १८/१०/२०२६ रोजी सेलू उड्डाणपुलाजवळ २ अनोळखी आरोपींनी पैशांची मागणी करून फिर्यादीला जबरदस्तीने मोटारसायकलवर बसविले. चौदामैल येथील पेट्रोल पंपाजवळ त्याच्याकडून ५००/—रूपये ऑनलाइन ट्रान्सफर करून घेतले व ३,०००/— रूपये रोख जबरदस्तीने हिसकावले. तसेच, मोबाईलवरून २,०००/— रूपये ऑनलाइन ट्रान्सफर करण्यास भाग पाडून मारहाण केली व कोणाला सांगितल्यास गंभीर परिणामांची धमकी दिली. याप्रकरणी पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कलम ३०९(४), ३(५)भारतीय न्याय संहिता, २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलीस स्टेशन कळमेश्वर येथील तपास पथकातील अधिकारी च अंमलदार यांनी गोपनिय बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे दिनांक १९/१०/२०२६ रोजी सदर

गुन्ह्यातील आरोपी **१) मयूर मारुती ओमकार वय २४ वर्ष, रा. सिद्धार्थ नगर,टेका नाका, नागपूर आणि २) आरोपी अलमास युसुफ मंसूरी, वय २५ वर्षे, रा. कॉटन मार्केट रेल्वे स्टेशनजवळ, नागपूर** याचा तात्काळ शोध घेवुन त्यांना चौदामैल येथून ताब्यात घेतले. यास कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्याने सदर गुन्हा केल्याची माहीती दिली.दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे.सदर गुन्हयाचा अधिक तपास कळमेश्वर पोलीस करीत आहेत.

## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची हुक्का पार्लरवर कारवाई, २ आरोपी अटक १० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

पोलीस स्टेशन कळमेश्वरः— **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री सागर खर्डे, उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर उपविभाग यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री अंकुश माने, प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांच्या नेतृत्वात दिनांक १८/१०/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने कळमेश्वर येथील गोंडखैरी येथील महामार्गालगत असलेल्या एटमॉस्फिअर हॉटेलमध्ये सुरू असलेल्या हुक्का पार्लरवर छापा टाकून प्रतिबंधित सुगंधित तंबाखू व हुक्का साहित्य असा एकूण १०,५००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त' केला.**

दिनांक १८/१०/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हे सावनेर उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने खात्रीशिर माहीती दिली की, नागपूर—अमरावती महामार्गावरील १४ मैल परिसरात गोंडखैरी येथील 'एटमॉस्फिअर' हॉटेलमध्ये हुक्का पार्लर सुरू असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलीस पथकाने सदर हॉटेलवर छापा टाकला असता, **आरोपी नामे १. अंशुमन डॅनियल टोपनो, वय ४२ वर्षे, रा. हिलटॉप, नागपूर २. डेव्हिड जॉन फिलिप्स, वय ३४ वर्षे, रा. जरीपटका, नागपूर हे मिळुन आले.**

**पोलीसांनी पंचासमक्ष महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेली वेगवेगळया कंपनीचा सुगंधित तंबाखू व हुक्का वापरण्याचे साहित्य असा एकुण १०,५००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केले आहे. सदर प्रकरणी आरोपीविरूध्द कलम ४(क),२१(क) सिगारेट आणि इतर तंबाखू**

उत्पादन(जाहिराती प्रतिबंधक व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि यांचे विनिमय) अधिनियम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे.

## नागपूर शहरातील मोक्का (MCOCA) गुन्ह्यातील पाहिजे असलेल्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणने घेतले ताब्यात

**दिनांक १५/१०/२०२६ रोजी नागपूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अउघड गुन्ह्यांचा तपास करीत असताना, घरफोडी व दुचाकी चोरीच्या गुन्ह्यांमध्ये मन अशोक चवरे, वय २१ वर्षे, रा. अमर नगर, हिंगणा, नागपूर याला त्याच्या साथीदारांसह ताब्यात घेतले. तपासादरम्यान सदर आरोपी हा सराईत गुन्हेगार असुन नागपूर शहरातील एमआयडीसी पोलीस स्टेशन अंतर्गत दाखल महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (MCOCA) गुन्ह्यात पाहिजे असलेला आरोपी असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणने सदर आरोपीला ताब्यात घेऊन पुढील कायदेशीर कार्यवाही केली.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद नरखेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक १८/१०/२०२६ रोजी नरखेड पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी दुर्गा माता मंदीर नरखेड येथे नाकाबंदी केली असता टिप्पर क्रं एम एच—४०/ डी एच—२४६३ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक **आरोपी क्र १) दुर्गेश शामसूदंर सुर्यवंशी, वय २४ वर्षे रा. वार्ड क्र १४ मोवाड, ता. नरखेड जि. नागपूर** याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता परवान्यापेक्षा अतिरिक्त रेती तसेच विहीत क्षमतेपेक्षा अतिरिक्त रेती असल्याचे निष्पन्न झाले. सदर वाहनामध्ये मध्ये परवान्यापेक्षा ३.१७ ब्रास रेती अतिरीक्त मिळुन आली. वाहन मालकाचे नाव **आरोपी क्र**

**२) अशपाक मुस्तफा अन्सारी, वय ५० वर्ष, रा. वार्ड क्र ०६ मोवाड ता. नरखेड जि. नागपूर** असे असल्याची माहीती प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष १) टिप्पर क्रं एम एच–४०/ डी एच–२४६३ किंमती २०,००,००० /–रूपये व २) ६.८७ ब्रास रेती किंमती ३५,५००/– रूपये आणि असा एकुण २०,३५,५००/रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद वाहन चालक आणि मालक याच्या विरूध्द पोस्टे नरखेड येथे कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सं सहकलम ६६(१), १९२(ए), २०७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी चालक अटक करण्यात आली आहे.**

## सायबर सुरक्षा जनजागृती महिना – ऑक्टोबर २०२६ अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात येत आहे सायबर सुरक्षा जनजागृती मोहीम

नागपुर ग्रामीण जिल्हयात **सायबर सुरक्षा जनजागृती महिना – ऑक्टोबर २०२६ अंतर्गत** मा. श्री. हर्ष ए पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सायबर सुरक्षा जनजागृती मोहीमेअंतर्गत उमरेड पोलीस स्टेशन अंतर्गत खालील प्रमाणे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन उमरेड** :– पोलीस उपनिरीक्षक किरण महागावे, पोलीस स्टेशन उमरेड यांनी उमरेड येथे गरबा कार्यक्रम तसेच नवदुर्गा सार्वजनिक मंडळ तारणा येथे भेट देऊन उपस्थितीतांना सायबर जनजागृतीपर मार्गदर्शन केले. तसेच मौजा धुरखेडा ग्रामपंचायत येथे सायबर जनजागृती संबंधाने उपस्थित जेष्ठ नागरिक तसेच नागरिकांना सायबर जनजागृतीपर मार्गदर्शन केले.

**सदर कार्यक्रमामध्ये सायबर जनजागृती व्हिडीओ दाखविण्यात आले. सायबर गुन्ह्यांचे विविध प्रकार, बनावट सोशल मीडिया प्रोफाईल, आर्थिक फसवणूक, फसवे कॉल व संदेश यापासून बचाव करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अनोळखी लिंक, ओटीपी, बनावट नोकरीच्या जाहिराती पासून सावध राहण्याबाबत मार्गदर्शन केले. मॉर्फिंग ,फिशींग, डिजिटल अरेस्ट, ट्रेडींग फसवणुक, तसेच डिजिटल व्यवहारांमध्ये घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर माहीती देवुन सायबर जनजागृती करण्यात आली. फसवणूक झाल्यास तात्काळ**

’सायबर हेल्पलाईन १९३० वर संपर्क साधावा किंवा cybercrime.gov.in या संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले.

नागरिकांनी डिजिटल व्यवहार करताना सतर्कता बाळगावी, कोणत्याही अनोळखी व्यक्तीस वैयक्तिक अथवा बँकिंग माहिती देऊ नये आणि सायबर फसवणूक झाल्यास विलंब न हेल्पलाईन क्रमांकावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन नागपूर ग्रामीण पोलीसांकडून करण्यात आले आहे.







## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, भिवापूर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापूर** :— दिनांक १८/१०/२०२६ रोजी भिवापूर पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा अडयाळ ता भिवापूर येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे भिवापूर पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) राकेश भाऊराव ठाकरे, वय ४२ वर्ष, २) सुर्यभान तिमा मडावी, वय ५२ वर्ष, ३) रूपचंद वातु गायकवाड, वय ५२ वर्ष, ४) रामभाऊ गंगाराम शहारे, वय ६५ वर्ष, सर्व रा. अडयाळ, ता. भिवापूर, जि. नागपूर** यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि रोख रक्कम ८६०/—रूपये असा एकुण ९१०/— रूपयांचा मुद्‌देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद ०४ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन भिवापूर येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर ०५ गुन्हे दाखल,

**दिनांक १८/१०/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण ०५ गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे राधेश्याम हिरालाल उपरेड, वय ३९ वर्ष, रा. कोथुळणा, ता. सावनेर, जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी शामराव सदाशीवराव देशभ्रतार, वय ४२ वर्ष, रा. आरंभी ता. नरखेड जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे १. विनोद रामराव देशमुख, वय ३५ वर्ष, रा. थुगाव निपानी, ता. नरखेड, जि. नागपूर २. हिमांशु ज्ञानेश्वर ढोबळे, वय २३ वर्ष, रा. सावरगाव, ता. नरखेड, जि. नागपूर याचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन अरोली** येथे आरोपी नामे सागर सखाराम नवदेवे, वय ३२ वर्ष, रा. निमखेडा, ता. मौदा, जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ११७० मिली देशी दारू, ३४ लीटर मोहाफुल दारू असा एकुण ४०००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

.

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर